## काऊंटर्स वर नोटा मोजण्याच्या यंत्रांसाठी

जानेवारी २९, २००४

डी सी एम (पीएलजी) क्र. ८७४/१०.३६.००/२००३-०४
अध्यक्ष, भारतीय स्टेट बँक
व्यवस्थापकीय संचालक, सहयोगी बँका
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीयकृत बँका
अध्यक्ष / मुख्य कार्यापालक अधिकारी, खाजगी क्षेत्रातील बँका /
विदेशी बँका / क्षेत्रीय ग्रामीण बँका / स्थानिक क्षेत्र बँका

प्रिय महोदय,

### <u>काऊंटर्स वर नोटा मोजण्याच्या यंत्रांची तरतूद आम्ही सूचित करतो की</u>

जनहित लक्षात घेऊन, बँकीग रेग्युलेशन ऍक्ट, १९४९ च्या खंड ३५ए च्या अंतर्गत, रिझर्व्ह बँकेने आपल्या दिनांक ७ नोव्हेंबर २००१ च्या निदेश डीबीओडी क्र. डी आय आर. बी. सी. ४३/१३.०३.०० / २००१-०२ च्या अनुसार, सर्व वाणिज्य बँकांच्या शाखांनी स्टेपल न केलेल्या अवस्थेत नोटांची देवघेव करणे आवश्यक आहे असे सूचित केले आहे. ग्राहकांना दिलेल्या नोटांच्या सांख्यिक अचूकपणाची खात्री करण्यासाठी पेमेंट (भरणा) काऊंटर्स वर दुहेरी प्रदर्शन नोटा मोजणी मशीन / नोटा मोजणी मशीन्सची तरतूद करण्यासाठी आम्ही वेळोवेळी बँकांना सूचित केले आहे.

२. परंतु, अनेक शाखांमधे अशा दुहेरी प्रदर्शन नोट मोजणी मशीन ची तरतूद नसल्याच्या तक्रारी आम्हाला समाजातील अनेक व्यक्तींकडून येत आहेत. जनमानसात ग्राहकांच्या उपयोगी साठी आपल्या शाखांमध्ये पुरेशा संख्येने नोट मोजणी मशीन्स उपलब्ध आहेत याची खात्री करावी.

३. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू
(व्ही. आर. गायकवाड)
मुख्य महा व्यवस्थापक